# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी

## शरीररचनाशास्त्र विभाग

## मरणोत्तर देहदानासंबंधीचे प्रतिज्ञापत्र

संपूर्ण नाव :- ..........................................................

पत्ता :- ..........................................................

..........................................................

संपर्क क्रमांक :- ..........................................................

दिनांक :-..........................................................

अर्जदाराचा
अलिकडच्या
काळातील फोटो
येथे चिकटवावा.

प्रति,
मा.प्राध्यापक व विभागप्रमुख,
शरीररचनाशास्त्र विभाग,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी

**विषय :- मरणोत्तर देहदान करण्याची इच्छा...**

महोदय,

उपरोक्त विषयानूसार माझ्या मृत्यूनंतर माझे संपूर्ण शरीर शैक्षणिक किंवा इतर कार्यासाठी दान करण्याची इच्छा आहे. आपल्या फॉर्ममध्ये नमूद केल्याप्रमाणे माझ्या जवळच्या नातेवाईकांनी सदरील इच्छापत्र स्वाक्षरी करुन दिले आहे.

तरी आपणास विनंती करण्यात येते की, माझ्या मृत्यूनंतर माझा मृतदेह संशोधन/विच्छेदन किंवा इतर आवश्यक असलेल्या कोणत्याही हेतूकरिता उपयोग करण्यास माझी हरकत नाही.

धन्यवाद.

आपला/आपली विश्वासू,

नाव व स्वाक्षरी

सदरील इच्छापत्र आम्हा सर्वांच्या उपस्थितीत लिहून देण्यात आले आहे. सदर व्यक्तीच्या मरणोत्तर देहदानास आमचा कोणताही आक्षेप नाही. तसेच त्यांच्या मरणोत्तर देहदानानंतर त्यांचा देह शैक्षणिक किंवा इतर कार्यासाठी वापरण्यास आमची काहीही हरकत नाही.

| अ.क्र. | नाव | नाते | पत्ता | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

## मरणोत्तर देहदान करु इच्छिणाऱ्या व्यक्ती आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी आवश्यक असलेली माहिती-

देहदान कायदा 1976 (सुधारीत) मुंबई ॲनाटॉमी ॲक्ट 5 (ब) प्रमाणे कोणत्याही व्यक्तीने आपल्या जिवंतपणी लेखी अथवा तोंडी देहदानाची इच्छा व्यक्त केली असेल किंवा व्यक्तीच्या निधनानंतर नातेवाईकांची इच्छा असेल तर मृत व्यक्तीचा मृतदेह अधिकृत वैद्यकीय संस्थानात दान करता येतो त्याकरिता न्यायालय किंवा पोलीसांच्या परवानगीची आवश्यकता नाही. (कॉरोनर कोर्ट परिपत्रक दिनांक 22 जानेवारी 1987)

मृतदेहाचा उपयोग वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि संशोधनासाठी केला जातो. देहदान हे मोठे कार्य आहे.

### देहदानाची इच्छा असणाऱ्या व्यक्तीसाठी नियम...

1. इच्छापत्र हे नातेवाईकांवर बंधनकारक नाही.
2. इच्छापत्र भरलेले नसेल तरीही देहदान करता येते पण नातेवाईकास आपली इच्छा लेखी असावी म्हणून इच्छापत्र भरावे.
3. आपल्या इच्छेनूसार धार्मिक विधी करुनही देहदान करु शकता.
4. देहदान रुढीविरोधी आहे पण अधार्मिक नाही.

### निधनानंतर मृताच्या नातेवाईकांची कर्तव्ये

1. समजून इच्छापत्र भरले असेल व तुमचा विरोध असेल तरीही मृताची अंतिम इच्छा पूर्ण करा.
2. निधनानंतर ताबडतोब जवळच्या/फॅमिली डॉक्टरांना/नोंदणीकृत किमान एमबीबीएस डॉक्टरांना बोलावून नैसर्गिक मृत्यूचा दाखला घ्यावा. त्याची एक प्रत देहदानाच्या वेळेस शरीररचनाशास्त्र विभागास सादर करावी. तसेच मृत्यू नोंद प्रमाणपत्राची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.
3. मृतदेह दिवसा किंवा रात्री केव्हाही स्विकारला जाईल.
4. मृतदेह रात्री आणल्यास आपण अपघात विभागातील वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय उप-अधिक्षक यांना लेखी विनंती अर्ज सादर करुन तो मृतदेह सकाळपर्यंत शवागारात शीतपेटीत ठेवावा.
5. मृत्यूनंतर शक्यतो लवकरात लवकर मृत्यूनंतर 4 ते 6 तासात मृतदेह वैद्यकीय महाविद्यालयात आणावा. कारण उशिर होऊन मृतदेहाचा वास येवू लागल्यास देहदान करुन काही उपयोग होणार नाही.
6. बाहेरगावाहून मृतदेह आणण्यासाठी शासकीय नियमाप्रमाणे गाडीच्या चालकास त्याचा वाहतूक खर्च दिला जाईल. गाडीच्या चालकाकडे त्याची छापील पावती असणे बंधनकारक आहे.
7. मृतदेह गाडीत ठेवताना व उतरविताना कर्मचाऱ्यांना मदत करावी. तीच तुमची शेवटची सेवा समजावी.
8. मृतदेह आणताना फक्त जबाबदार व्यक्तींनीच बरोबर यावे.
9. देहदानानंतर आपणास प्रमाणपत्र दिले जाईल.
10. अनैसर्गिक मृत पावलेल्या व्यक्तीचे आणि पोलीसांच्या ताब्यात असलेले मृतदेह देहदानाकरिता शरीररचनाशास्त्र विभागात स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

## देहदानाची पध्दत

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी येथील शरीररचनाशास्त्र विभागात मृतदेह स्विकारले जाईल.

1. मृत्यूनंतर आपला देहंदान केला जावा अशी इच्छा असणाऱ्या व्यक्तीला आपली इच्छा एका विशिष्ट फॉर्मवर लिहून द्यावी लागते. सदरील फॉर्म हा शरीररचनाशास्त्र विभागात उपलब्ध आहे. काही अडचणींमुळे सदरील फॉर्म भरला गेला नाही. परंतु देहदानाची इच्छा जर आपण आपल्या कुटूंबियात प्रगट केली असेल तर मृत्यूनंतर आपले नातेवाईक ऐनवेळी फॉर्म भरुन देहदान करु शकतात.
2. विभागात विहीत नमुन्यातील फॉर्म भरत असताना आपला एक फोटो फॉर्म सोबत लावावा. त्याचप्रमाणे फॉर्मवर नमूद केल्याप्रमाणे जवळच्या नातेवाईकाची (आई, वडील, पती, पत्नी, मुलगा, मुलगी किंवा इतर) नावे लिहून त्याची स्वाक्षरी फॉर्मवर घेण्यात यावी. आपल्या फॉर्मची नोंद डोंनर रजिस्टरमध्ये घेऊन त्यात नोंदणी क्रमांक आपणास कळविण्यात येईल पूर्ण भरलेल्या फॉर्मची एक छायांकित प्रत आपल्या कुटूंबाजवळ देऊन ठेवावी.
3. मृत्यूनंतर देहदान करताना सोबत मृत्यूचे प्रमाणपत्र (DEATH CERTIFICATE) आणणे आवश्यक आहे. तसेच देहदान करताना सोबत असलेल्या नातेवाईकापैकी एका व्यक्तीची ओळखपत्राची सत्यप्रत विभागात जमा करावी. मृत्यूनंतर नातेवाईकांनी दुरध्वनीव्दारे तात्काळ वैद्यकीय महाविद्यालयाच्या शरीररचनाशास्त्र विभागात कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. तसेच कार्यालयीन वेळेत व्यतिरिक्त वैद्यकीय उप-अधिक्षक किंवा अपघात विभागातील वैद्यकीय अधिकारी (C.M.O.) यांच्याशी संपर्क साधावा.
4. मृत्यूचे कारण खालीलपैकी असल्यास देहदान स्विकारले जाणार नाही.
    1. गुप्तरोग (एड्स, सिफीलालीस)
    2. रक्तातील जंतुसंसर्ग (सेप्टीसेमिया)
    3. रक्ताचा कावीळ (हिपॅटायटीस - बी आणि सी)
    4. संक्रमित क्षयरोग (ॲक्टीव्ह टी.बी.)
    5. धनुर्वात (टिटॅनस)
    6. मेडीको लिगल केसेस (एम.एल.सी)
    7. कोव्हिड-19 ने संक्रमित
    8. रेबीज
    9. बेडसोर असलेले मृतदेह, ईत्यादी.

## संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे

1) वैद्यकीय अधिकारी, अपघात विभाग, शा.वै.म. व रु., परभणी- 02452-220182
2) वैद्यकीय अधिक्षक, शा.वै.म. व रु., परभणी - 9822984440
3) वैद्यकीय उप-अधिक्षक, शा.वै.म. व रु., परभणी - 8698894444
4) डॉ.संजय एम. राठोड, अधिष्ठाता, शा.वै.म., परभणी-9422961700
5) डॉ.रचिता माळवतकर, सहाय्यक प्राध्यापक, शरीररचनाशास्त्र विभाग, शा.वै.म., परभणी-9975158288
6) अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी - 02452-299294/95/96